**वाचले :–** **०१.** जिल्हा न्यायालय, नांदेड कार्यालयीन आदेश क्र. आस्था/ ब–४(१)/१७८१/२०२१, दिनांक १२.०३.२०२१.

**०२.** दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली यांचे पत्र जावक क्र.आस्था/२२१/२०२१ दिनांक २० एप्रिल, २०२१.

**०३.** कार्यालयीन अहवाल दिनांक १६.०७.२०२१ व त्यावरील आदेश.

– – – – – – –

## –:: कार्यालयीन आदेश ::–

ज्याअर्थी, संदर्भात अ.क्र. १ येथे नमूद आदेशानुसार नांदेड जिल्हा न्यायिक विभागाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीकाच्या रिक्त पदांवर दिलेल्या प्रथम नियुक्तीनुषंगाने, निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र. ९७ वरील उमेदवार श्री संदिप प्रकाशराव गोवंदे हे प्रथम नियुक्तीच्या ठिकाणी, आदेशाची बजावणी झाल्यापासून विहित एक महिन्याच्या कालावधीत, रुजू झाले नाहीत,

आणि ज्याअर्थी, संदर्भात अ.क्र. २ येथे नमूद केल्याप्रमाणे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली यांनी त्यांचे पत्र जावक क्र.आस्था/२२१/२०२१ दिनांक २० एप्रिल, २०२१ अन्वये श्री संदिप प्रकाशराव गोवंदे हे प्रथम नियुक्तीच्या पदावर विहित एक महिन्याच्या कालावधीत रुजू न झाल्याबाबत या कार्यालयास अवगत केले आहे. सबब श्री गोवंदे हे नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यामुळे प्रथम नियुक्ती रद्द करण्यात येऊन त्यांची नावे निवड / प्रतिक्षा यादीतून वगळण्याची प्रस्तावीत करण्यात आले आहे.

त्याअर्थी, मी, श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड याद्वारे निवड / प्रतिक्षा यादीतील अ.क्र.९७ वरील उमेदवार श्री संदिप प्रकाशराव गोवंदे यांची दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बिलोली या न्यायालयाच्या आस्थापनेवर दिलेली प्रथम नियुक्ती, याद्वारे तात्काळ प्रभावाने रद्द करीत असून पुढे निर्देशित करतो की, वर नमूद उमेदवाराचा नाव नांदेड जिल्हा न्यायिक विभागासाठीच्या कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड / प्रतिक्षा यादीतून तात्काळ प्रभावाने वगळण्यात यावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :– १६.०७.२०२१. )

(श्रीकांत ल. आणेकर)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

पृष्ठांकन क्र/आस्था/ब–४(१)/3632 /२०२१.

प्रतिलिपी, माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव –

०१. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बिलोली.
०२. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
०३. सहाय्यक अधिक्षक, वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
०४. संबंधीत उमेदवार श्री संदिप प्रकाशराव गोवंदे, रा. कामठा (खु.) ता. व जि. नांदेड यांना **" नोंदणीकृत पोंच देय डाकेने "**
०५. आदेशाची एक प्रत या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :– १६.०७.२०२१. )

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड.

– – – – – – –